# अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (फळे),
## डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला

पोस्ट कृषि नगर, अकोला- ४४४ १०४ (महा.)

जाक्र. अभाससं प्रकल्प (फळे) /भांडार/ २१९/२०२५.  दि. ०२/ ०९/२०२५.

## जाहीर लिलाव

**विषय :-अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (फळे), डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, या विभागातील असलेले जड वस्तू संग्रहाची व इतर वस्तूंची विक्री करण्याकरिता जाहीर लिलाव करण्याबाबत .**

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने, अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (फळे), डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, या विभागातील आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरुपयोगी व नादुरुस्त अशा जड वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक, लाकडी वस्तु व ईतर वस्तुचा जाहीर लिलाव रीतसर प्रक्रियेद्वारे करणे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सदर वस्तू अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (फळे), डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, या विभागामध्ये पाहणी करण्याकरिता ठेवण्यात आले आहे. सदरील वस्तूंची व्यक्तीशः पाहणी करण्याकरिता कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:०० पर्यंत ठेवण्यात आली आहे.

उपरोक्त वस्तूंची विक्री करण्याकरिता खुला जाहीर लिलाव **दिनांक ०९/०९/२०२५ रोजी मंगळवार** या दिवशी समितीद्वारे आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये बोली बोलणारे व्यक्ति तथा संस्था यांनी सकाळी १० वाजता उपस्थित राहून बोलीकरिता अग्रिम **अनामत रक्कम रुपये २०००/-** रोख स्वरुपात कार्यालयात भरावी लागेल, त्यानंतर बोली बोलण्याकरिता लिलावामध्ये सहभागी होता येईल.

**प्रभारी अधिकारी तथा कनिष्ठ उद्यानविद्यावेत्ता**
**अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प,फळे**
**डॉ प.दे.कृ.वि.,अकोला**

**जाहीर लिलावाचा अटी व शर्ती :-**

१. लिलावात निघालेले भंगार निरुपयोगी व नादुरुस्त अशा जड वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक, लाकडी वस्तु व ईतर साहित्य यांचा लिलाव जसे आहेत जिथे आहेत या तत्वावर केल्या जाईल .

२. जुन्या भंगार साहित्याच्या लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.

३. लिलाव समिति बोली बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल, त्यांना लिलावाची बोली पाहून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठित समिति घेईल. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.

४. साहित्य बोली कायम झाल्यास संपूर्ण रक्कमेच्या ५०% रक्कम लिलाव त्याच दिवशी भरावी लागेल व उर्वरित ५०% रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासून तीन दिवसाच्या आत भरावी लागेल. लिलावाची संपूर्ण रक्कम कार्यालयात जमा केल्यानंतर साहित्याची उचल करता येईल रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

५. बोली कायम झाल्यास संबधित व्यक्तींनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्याची स्वतःची असेल.

७. लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठित समितीकडे राखून ठेवला आहे.

८. लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी.

९. लिलाव समितीचे सदस्य व संबंधित कार्यालयीन कर्मचारी लिलावाचा ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरीक्षण करतील.

प्रति,
Officer Incharge
ARIS, cell
Dr. PDKV, Akola

यांना विद्यापीठाच्या वेबसाईट वरती प्रसिद्धी करिता।